# अनुकंपा भरती बाबत उमेदवारांना आवाहन

शासन निर्णय दिनांक ११ सप्टेंबर २०१९ नुसार ४१ अनुकंपा धारक उमेदवारांना नियुक्ती देण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार अनुकंपा उमेदवारांची जेष्ठता यादी जिल्हा परिषद उस्मानाबाद च्या **www.zposmanabad.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. कागदपत्रांची पडताळणी करणेसाठी अ.क्र. ०१ ते ८० पर्यंतचे उमेदवारांना अनुकंपा भरती प्रक्रियेकरीता कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दिनांकः- १६/९/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह,जिल्हा परिषद उस्मानाबाद येथे कॅम्प आयोजीत करण्यात आलेला आहे.

तरी उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, जि.प.उस्मानाबादच्या संकेत स्थळावरील जेष्ठता यादीचे अवलोकन करुन ०१ ते ८० उमेदवारांनी मुळ कागदपत्रासह वरील दिनांकास वेळेवर उपस्थित राहावे व मुळ कागदपत्रे सादर केलेले असल्यास त्यांच्या सत्यप्रतिसह उपस्थित राहावे. सदर दिवशी आपण उपस्थित न राहिल्यास अनुकंपा नियुक्तीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी, तसेच आपण अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज केलेल्या पत्यावर कागदपत्राच्या पडताळणीसाठी पत्रव्यवहार रजिस्टर पोष्टाने केलेला आहे. तरी आपण दिलेल्या पत्यावरुन पत्र प्राप्त करुन घ्यावे.असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी केले आहे.